माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ९३२/२०२१**

**अपिलार्थी, श्री. प्रसाद श्रीराम पान्हेरकर**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी,**
कामगार विभाग म.इ. व इतर बांधकाम मंडळ, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त,**
कामगार विभाग म.इ. व इतर बांधकाम मंडळ, चंद्रपूर, ता.जि. चंद्रपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.०३.२०२३**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : अनुपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २३.११.२०२० | २२.१२.२०२० | ०४.०१.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २३.११.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " बांधकाम का.नो. क्र. ३३३३२०००८३९९ असून आपल्या कार्यालयाव्दारा मला दिलेले आर्थिक व इतर सहकार्य माहिती १) माझ्या B.pan Book खात्यात किती व कोणत्या तारखेला अनुदान दिले गेले २) माझे कार्ड ऑनलाईन नुतनीकरण झाले असल्यास त्या बाबतची माहिती ३) बांधकाम कामगाराला शासनाव्दारे जाहिर केलेले साहित्य अनुदान माहिती २०१९-२०" इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये, मुद्दा क्र. १ बाबत अर्जदाराच्या खात्यात अवजारे व हत्यारे खरेदी करीता ५०००/- बँक ऑफ इंडियाच्या अकाऊंट नं. ९६१७१०११०००१७९७ मध्ये दिनांक २४.०६.२०१९ रोजीच्या RTGS व्दारे लाभ देण्यात आलेला आहे. मुद्दा क्र. २ बाबत आपले ऑनलाईन मध्ये नुतनीकरण किंवा नवीन नोंदणी तसेच इतर कोणत्याही लाभाचा अर्ज प्राप्त झालेला नाही. तसेच मुद्दा क्र. ३ बाबत बांधकाम कामगारांनी कार्यालयात केलेल्या लाभाच्या अर्जावरुन अर्ज तपासणी अंती पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो. याबाबतचा तपशिल mahabocw.in या संकेतस्थळावर पहावा, असे अपिलार्थीस सुचीत केले आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होऊन **दिनांक ०४.०१.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " अदखल पात्र ठरविल्यामुळे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे दिसून येत नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १९.०३.२०२१ रोजी** "माहिती न मिळाल्यामुळे " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक ०५.०४.२०२१ रोजी प्राप्त झाला आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १४.०३.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित असून विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक कामगार आयुक्त, श्री. मा.पे. मडावी उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२.१२.२०२० रोजी अपिलार्थीस माहिती पुरविलेली आहे. त्यात अर्जदाराच्या खात्यात ५,०००/- रुपये इतकी रक्कम दिनांक २४.०६.२०१९ रोजी प्रदान करण्यात आलेली असून मुद्दा क्र. २ बाबत ऑनलाईन मध्ये नुतनीकरण किंवा नवीन नोंदणी तसेच इतर कोणत्याही लाभाचा अर्ज प्राप्त झालेला नाही. तसेच मुद्दा क्र. ३ बाबत बांधकाम कामगारांनी कार्यालयात केलेल्या लाभाच्या अर्जावरुन अर्ज तपासणी अंती पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो. याबाबतचा तपशिल mahabocw.in या संकेतस्थळावर पहावा, असे अपिलार्थी यांना सुचीत केलेले आहे. तसेच उपलब्ध यादी देखील अपिलार्थी यांना पुरविण्यात आलेली असल्याचे आढळून येते. त्याविरुध्द दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्यात आली नाही. मात्र वरील माहिती अर्जावर विहीत मुदतीत उपलब्ध माहिती तात्काळ प्रदान केलेली असल्यामुळे ज्या कालावधीत माहिती अर्ज व प्रथम अपील अर्ज दाखल केलेला आहे. त्या कालावधीत राज्यात कोरोना महामारीचा काळ होता. सदर कालावधीत शासनातर्फे वेळोवेळी निर्बंध लावण्यात येत होते. त्या कालावधीतील वैद्यकीय आणीबाणीच्या परिस्थितीमुळे प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेता आलेली नसल्याचे उपस्थित प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर खुलासा केलेला आहे. तसेच अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती दिलेली असल्यामुळे व्दितीय अपील अर्ज निकाली काढावा, अशी प्राधिकरणाच्या वतीने विनंती करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी सादर केलेला माहिती अर्ज व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद तसेच आज झालेल्या सुनावणीत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेला खुलासा इत्यादींचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांना अपेक्षित असलेली माहिती ही विहीत मुदतीत दिनांक २२.१२.२०२० रोजी प्रदान केलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अर्जावर सुनावणी न घेण्याबाबत केलेला खुलासा हा कोरोना कालावधीतील वैद्यकीय आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेता, वरील खुलासा मंजूर करीत प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १४.०३.२०२३**
जावक क्रमांक 4968 दिनांक

4 SEP 2023

M-2023/932-2021/पान्हेरकर